


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ७७, बुधवार १२ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## लिफ्ट देऊन लुटणारी टोळी गजाआड !

### ■ नगर-कल्याण महामार्गावरील वासुंदे चौकात पकडली टोळी ■ एक पुरूष, दोन महिलांचा समावेश

टाकळीढोकेश्वर : प्रतिनिधी

**महामार्गावर वाहनांच्या प्रतिक्षेत असलेल्या महिला हेरून त्यांना लिफ्ट देण्याचा बहाणा करून वाहनात बसवायचे पुढे गेल्यावर निर्मनुष्य ठिकाणी कार थांबवून कारमध्ये बसविण्यात आलेल्या महिलेस धमकावत, मारहाण करीत त्यांच्याकडील दागिने, पैसे बळजबरीने हिसकाऊन घेत त्यांना कारच्या खाली उतरवून धुम ठोकणारी टोळी ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे जेरबंद झाली आहे.**

नगर-कल्याण महामार्गावर या टोळीस नागरीकांनी जेरबंद करून पोलीसांच्या हवाली केले. या टोळीत एक पुरूष, दोन महिला व एका अल्पवयीन मुलीचा समावेश आहे. नगर-कल्याण महामार्गावर पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गेल्या काही दिवसांत लुटीच्या अनेक घटना घडल्या होत्या. प्रत्येक घटनेमध्ये साम्य होते. पारनेर पोलीस या घटनांमुळे चक्राउन गेले होते. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी खबऱ्यांमार्फत या टोळीचा माग काढण्याचा प्रयत्न केला, मात्र ही टोळी पोलीस प्रशासनास ताकास तुर लागू देत नव्हती.

१० फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास मालन कोंडीबा जाधव वय ६५ रा. वडनेर हवेली, ता. पारनेर या ढोकी शिवारातील एस.के. हॉटेलजवळ वाहनाची प्रतिक्षा करत होत्या.नेहमीप्रमाणे या टोळीने या आजींना हेरले आणि त्यांच्याजवळ ती कार येऊन थांबली. पुरूष कार चालवत होता तर दोन महिला व एक लहान मुलगी कारमध्ये होती. दोघींपैकी एका महिलेने आजी कुठे जायचे आहे अशी विचारणा करत कारमध्ये बसा आम्ही तुम्हाला सोडतो असे सांगत आजींना कारमध्ये बसण्यास भाग पाडले गेले. नेहमीप्रमाणे कार पुढे गेल्यानंतर पेट्रोल संपल्याचा बहाणा करून कार थांबविण्यात आली. त्यानंतर मालन जाधव यांना दमदाटी करून, मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम व सोन्याचे दागिणे हिसाकावून घेत कारखाली उतरुन देण्यात आले. आणि कारसह आरोपींनी पोबारा केला.



■ महिलांना लिफ्ट देउन लुटणाऱ्या टोळीची कार पारनेर पोलीसांनी ताब्यात घेतली आहे.

#### पोलीस पथकाने टोळीस घेतले ताब्यात

या टोळीस टाकळीढोकेश्वर दुरक्षेत्रात नेण्यात येऊन पोलीसांच्या हवाली करण्यात आले. या घटनेची माहीती समजल्यानंतर पोलीस उपाधीक्षक संपत भोसले, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, उपनिरीक्षक रणजीत मारग यांच्या पथकाने या टोळीस ताब्यात घेतले.

#### नातवाला फोन

या टोळीने पैसे तसेच दागिने लुटल्यानंतर मालन जाधव या आजींनी ढोकी टोल नाक्यावर कामाला असलेल्या आपल्या नातवाला फोन करून झालेल्या घटनेची माहीती दिली. मात्र तोपर्यंत आरोपींची कार टोलनाका ओलांडून भरधाव वेगाने निघून गेली होती.

#### वासुंदे चौकात पकडली कार

आजींच्या नातवाने टोलनाक्यापुढील गावांमध्ये आपल्या मित्रांना फोन करून कारचे वर्णन सांगून घडलेल्या घटनेची माहीती दिली. पुढे अनेक गाड्यांचा ताफा त्या कारचा शोध घेऊ लागला. ती कार वासुंदे चौकात आल्याचे लक्षात आल्यानंतर चौकामध्ये ही कार आडविण्यात आली. तात्काळ तिथे मोठा जमाव जमा झाला. जमावाने या टोळीची यथेच्छ धुलाई केली.

#### हे आहेत आरोपी

नागेश उर्फ उमेश बापू खडतरे रा. झारेवाडी, ता. मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, लक्ष्मी नागेश उर्फ उमेश खडतरे रा. मल्लीकार्जुन नगर, सोलापूर, दीपा सचिन पवार रा. मोहळ जि. सोलापूर व एक अल्पवयीन मुलगी यांचा या आरोपींमध्ये समावेश आहे. ही टोळी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर इतर पोलीस ठाण्यातही गुन्हे दाखल आहेत.

#### १८ जानेवारीच्या लुटीची उकल

मालन जाधव यांच्या फिर्यादीवरून या टोळीतील सदस्यांविरोधात लुटमारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.१८ जानेवारी रोजी टाकळीढोकेश्वर शिवारात ढोकी येथील बबई बाळू कुलाळ वय ५८ यांना अशाच पध्दतीने याच टोळीने लुटले होते. बबई कुलाळ यांनी या टोळीला ओळखल्याने बबई यांच्या फिर्यादीवरून या टोळीविरोधात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रणजीत मारग, पोलीस उपनिरीक्षक तपासी अधिकारी

## सोयाबीन खरेदी मुदतवाढीसाठी संसदेबाहेर आंदोलन

### खा. नीलेश लंके यांचा सहभाग
### शेतकऱ्यांना द्यायचे असेल तर मोकळ्या मनाने द्या!

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**सोयाबीन खरेदीसाठी किमान एक महिन्याची मुदतवाढ मिळावी या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या खासदारांनी संसदेबाहेर आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.**



या मागणीसंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी गेल्या आठवडयात माध्यमांशी बोलताना सोयाबीन खरेदीसाठी एक महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. सबंधित मंत्र्यांची भेट घेऊन तसे निवेदनही त्यांनी सादर केले हाते. या मागणीची दखल न घेतली गेल्यास संसदेबाहेर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.

शासनाकडून सोयाबीन खरेदी सुरू करण्यात आल्यानंतर या योजनेस पूर्वी मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र अद्यापी अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ मिळालीच पाहिजे अशी आग्रही मागणी मंगळवारी महाविकास आघाडीच्या खासदारांनी संसदेबाहेर केली.

यासंदर्भात बोलताना खा. लंके म्हणाले, शासन सोयाबीन खरेदीसाठी आठ दिवसांची मुदत देते. आठ दिवसांत किती शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी होईल ? त्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. आठ दिवस मुदतवाढ दिल्यानंतर शेतकऱ्यांना ते समजण्यात दोन दिवस जातात. त्यात एखादी सुटी आली तर चार दिवसांत काय होणार ?

शेतकऱ्यांना द्यायचे असेल तर मोकळया मनाने द्या या विधानाचा लंके यांनी मंगळवारी पुनरूच्चार केला. सोयाबीन खरेदी झाली नाही तर शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. शेतकऱ्यांना व्यापाऱ्याच्या दारात जाऊन कवडीमोल भावाने काबाड कष्ट करून पिकविलेले सोयाबीन विकण्याची त्यांच्यावर पाळी येईल असे खा. लंके म्हणाले.

#### या खासदारांचा आंदोलनात सहभाग

खा. सुप्रियाताई सुळे बारामती, खा. नीलेश लंके अहिल्यानगर, खा. ओमराजे निंबाळकर धाराशिव, खा. प्रशांत पडोळे भंडारा, खा. प्रणिती शिंदे सोलापूर, खा. बळवंत वानखडे अमरावती, खा. शिवाजी काळगे लातूर, खा. प्रतिभाताई धानोरकर चंद्रपुर, खा.वर्षाताई गायकवाड मुंबई, खा. कल्याण काळे जालना.

## पाणी योजनांची केंद्रीय समितीमार्फत चौकशी करा

### ■ खासदार नीलेश लंके यांनी वेधले लोकसभेचे लक्ष
### ■ योजनांमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**नगर लोकसभा मतदारसंघात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत ८३० पाणी योजना मंजुर झाल्या असून या पाणी योजनांच्या कामांमध्ये मोठा गैरव्यवहार झाला असल्याने या कामांची केंद्रीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी मंगळवारी लोकसभेत केली.**



■ जल जीवन मिशन योजनेअंतर्गत नगर लोकसभा मतदारसंघात राबविण्यात आलेल्या पाणी योजनांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराकडे खासदार नीलेश लंके यांनी संसदेचे लक्ष वेधले.

सभागृहात पाणी योजनांमधील गैरप्रकाराकडे सभागृहाचे लक्ष वेधताना खा. लंके म्हणाले, पाणी ही निसर्गाचे वरदान आहे ते जपून वापरण्याचा सल्ला महात्मा गांधी यांनी दिला आहे. त्याच धतवर केंद्र शासनाने हर घर नल, और हर घर जल अशी घोषणा देत अतिशय महत्वपुर्ण जलजीवन मिशन ही योजना राबविली आहे. या योजनेसंदर्भात माझ्या मतदारसंघाचा जरी विचार केला तर त्यात ८३० योजना मंजुर झाल्या आहेत. त्यासाठी १ हजार ३३८ कोटी रूपयांचा निधी मंजुर करण्यात आलेला आहे. या योजनांच्या कामांवर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून देखरेख केली जाते. जीवन प्राधिकरणच्या माध्यमातून पाणी योजनांवर ३ हजार २०० कोटी रूपये खर्च केले जात आहेत. या योजना अतिशय निकृष्ट दर्जाच्या झालेल्या असून केंद्रीय समितीमार्फत या योजनांच्या कामांची चौकशी करण्याची मागणी खा. लंके यांनी केली.

लोकसभेत गेल्यानंतर खासदार नीलेश लंके हे जल जीवन योजन मिशन योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणी योजनांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराकडे सातत्याने लक्ष वेधत आहेत. जिल्हा विकास सनियंत्रण समितीच्या जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या बैठकीतही खा. लंके यांनी आक्रमक भूमिका घेत या भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले होते. माझ्यासोबत चला मी तुम्हाला या पाणी योजनांमधील भ्रष्टाचार दाखवितो भ्रष्टाचार नसेल तर मी राजिनामा देतो अशी आक्रमक भूमिका घेत खा. लंके यांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आव्हान दिले होते. या पार्श्वभुमीवर खा. लंके यांनी संसदेमध्ये पुन्हा या प्रश्नावर सभागृहाचे लक्ष वेधले आहे.

## अण्णा हजारेंनी केजरीवालांनंतर ठाकरेंनाही सुनावले!

### ज्या रंगाचा चष्मा, त्या रंगाचे जग | संजय राऊतांच्या टीकेलाही प्रत्युत्तर

राळेगण सिद्धी : प्रतिनिधी

**राजधानी दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा भाजपकडून दारुण पराभव झाला. यात माजी मुख्यमंत्री व आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल तसेच माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले. यावरून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली होती. त्यांच्या टीकेवर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे तसेच खासदार संजय राऊत यांनी अण्णा हजारेंवर निशाणा साधला होता. त्याला आता अण्णा हजारे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.**



उद्धव ठाकरे अण्णा हजारे यांचे नाव न घेत टीका करताना म्हंटले होते की, दिल्लीत केजरीवाल यांचा पराभव झाला तेव्हा काहींनी झोपेतून उठून प्रतिक्रिया दिली, अशी टीका केली होती. यावर अण्णा हजारे म्हणाले, एरवी मी राजकीय विषयांवर बोलत नाही. पण दिल्लीच्या निकालाबाबत सगळ्यांनीच प्रशंसा केली, एखादा माणूस चुकला असेल तर चुकू द्या. आपण कशाला त्यावर बोलायचे, असे म्हणत अण्णा हजारेंनी उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिले आहे.

**अण्णा हजारे यांना महात्मा अरविंद केजरीवालांनी केले**

तसेच खासदार संजय राऊत यांनी देखील अण्णा हजारे यांच्यावर टीका केली होती. संजय राऊत म्हणाले होते, अण्णा हजारे यांना महात्मा करण्याचे काम अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांनी केले, नाहीतर ते राळेगणचेच दैवत होते. नाहीतर अण्णा हजारे यांनी दिल्ली कधी पाहिली असती? रामलीला मैदान, जंतर मंतर रोड कधी पाहिला असता? त्यावेळी आंदोलनाला जो काही आवाका दिला त्यानंतर ते देशाला माहित झाले, नाहीतर ते राळेगणचे दैवत होते. महाराष्ट्रात भ्रष्टाचाराचे इतके स्फोट झाले. मोदी सरकार असो किंवा शिंदे-फडणवीसांचे सरकार असेल त्यावेळी अण्णांनी राळेगणमध्ये कूसही बदलली नाही, हे दुर्दैवाने सांगायला लागत आहेत. भ्रष्ट सरकारच्या बाजूने ते उभे राहिलेत. अण्णा हजारे यांची भूमिका संशयास्पद आहे.

**ज्या रंगाचा चष्मा असतो त्या रंगाचे जग**

संजय राऊत यांनी केलेल्या टीकेवर अण्णा हजारे प्रत्युत्तर देताना म्हणाले, ज्या रंगाचा चष्मा असतो त्या रंगाचे जग समोरच्याला दिसते. चष्माच त्या रंगाचा आहे. मग जग तसे दिसणारच, असा पलटवार अण्णा हजारे यांनी केला आहे. दिल्लीत अरविंद केजरीवाल यांच्या परभवानंतर अण्णा हजारे म्हणाले होते, हीच आम्ही अपेक्षा ठेवली होती तुमच्याकडून, नाईलाजास्तव आम्हाला बोलावे लागले. एवढे प्रेम केले तुमच्यावरती. तुम्ही रस्ता सोडून गेलात म्हणून नाईलाजास्तव बोलावे लागले, असे म्हणत अण्णा हजारे भावुक देखील झाल्याचे पाहायला मिळाले.

## खा. लंकेंचा व्हिडीओ कॉल आणि आंदोलकाच्या मागण्या मान्य !

### इमामपुर घाट ते पांढरी पुल दरम्यान अपघात प्रवण क्षेत्र घोषित



अहिल्यानगर : प्रतिनिधी

**अहिल्यानगर-संभाजीनगर महामार्गावरील इमामपुर घाट ते पांढरीपुल या ४ किलोमीटरच्या पटटयात वारंवार अपघात होत असून त्यावर उपाय योजना करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर ग्रामस्थांनी सुरू केलेले आंदोलन खासदार नीलेश लंके यांनी नवी दिल्ली येथून व्हिडीओ कॉलद्वारे अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर हा चार किलोमीटरचा रस्ता अपघात प्रवण क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.**

या भागात दरवर्षी सरासरी १० हून अधिक लोक अपघातात मृत्यूमुखी पडतात. अनेक वाहनचालक तसेच व्यवसायिकांच्या मालमत्तांचे नुकसान होते.या धोकादायक रस्त्यासंदर्भात अनेकदा निवेदने देण्यात आली, आंदोलनेही झाली. मात्र त्यावर तोडगा निघाला नाही.

अलिकडेच बंडू गणपत भवर वय ५२ यांचा ट्रकच्या धडकेत मृत्यू झाला. त्यात २ हॉटेल आणि ३ दुचाकींचेही नुकसान झाले. या घटनेमुळे नागरीकांचा संयम सुटून दि.१० फेब्रुवारी रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन सुरू करण्यात आले.

आंदोलन सुरू झाल्यानंतर मा. नगरसेवक योगीराज गाडे व इतर नागरीकांनी नवी दिल्ली येथे अधिवेशनानिमित्त असलेल्या खासदार नीलेश लंके यांच्याशी संपर्क साधला. खा. लंके हे केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्यासमवेत होते. त्यांनी जनतेच्या उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# जुना स्मार्टफोन स्वस्त मिळतोय म्हणून नको या ५ गोष्टींकडे लक्ष

**गेल्या काही काळात देशातील स्मार्टफोन मार्केटमध्ये मोठा बदल झाला आहे. तसेच, लोकांचा मोबाईल मार्केटकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलला आहे. काही अहवालात तर असे समोर आले आहे की, गेल्या काही महिन्यांत भारतात सेकंडहँड स्मार्टफोनची बाजारपेठ वाढली आहे. नूतनीकरण केलेल्या म्हणजेच वापरलेल्या स्मार्टफोनची मागणी लोकांमध्ये पूर्वीपेक्षा जास्त झाली आहे. आता जवळपास प्रत्येक घरात एकापेक्षा जास्त स्मार्टफोन आहेत. कारण, आता जवळ- जवळ प्रत्येक कामात मोबाइल आवश्यक झाला आहे. अशात अनेक लोक महाग स्मार्टफोनवर पैसे खर्च न करता किफायतशीर सेकंड हँड स्मार्टफोन शोधतात. असे मोबाइल फोन ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर सहज उपलब्ध आहेत. जर तुम्हीही जुना फोन शोधत असाल किंवा तुमचा फोन विकत असाल तर आज आम्ही अशाच ५ महत्त्वाच्या गोष्टी सांगणार आहो. ज्या सेकंड हँड स्मार्टफोन खरेदी करण्यापूर्वी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.**

- ऑनलाइन खरेदी करताना खरेदी करणारे आणि विक्री करणारे तर अनेक सापडतात. पण, ही फसवणूक तर नाही ना, याची खात्री करणेदेखील आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सेकंड हँड स्मार्टफोन खरेदी करताना व्हर्च्युअल म्हणजेच ऑनलाइन पेमेंट न करण्याचा प्रयत्न करा. निदान फोन मिळतपर्यंत तरी नाही. अनेकदा फोन विक्रेते लिंक पाठवतात आणि त्यांना फोन तपासण्यास किंवा पेमेंट करण्यास सांगतात, जर तुम्ही त्या व्यक्तीला नीट ओळखत नसाल तर अशा लिंक्स उघडण्याचा प्रयत्न करू नका. आवश्यक असल्यास, केवळ सुरक्षित डिव्हाइस वापरा.
- सर्वप्रथम, तुम्ही खरेदी करत असलेल्या स्मार्टफोनचे इनव्हॉइस बिल आणि फोनचा रिटेल बॉक्स घ्या. जर विक्रेत्याच्या वतीने असे सांगितले जात असेल की बिल किंवा बॉक्स खराब झाले आहे किंवा हरवले आहे, तर याचा लेखी किंवा व्हिडीओ पुरावा घ्या. दुसरीकडे, जर फोन कोणत्याही ऑनलाइन शॉपिंग साइटवरून खरेदी केला असेल, तर तेथून सहजपणे ई-चालन तयार केले जाऊ शकते. तुम्हाला कोणतेही बिल किंवा बॉक्स मिळालेला असला तरी फोनचा आयएमईआय नंबर आणि फोनचा आयएमईआय नंबर एकदा शोधलाच पाहिजे. असे केल्याने हे एक अस्सल उपकरण असल्याचे स्पष्ट होईल. खरेदी केलेला फोन ड्युअल सिम असेल तर त्याचा IMEI नंबर देखील दोन असेल.
- फोनचे लुक्स छान आहेत आणि स्क्रीनवर कोणतेही Scratches नाहीत, हे पाहून अधिक आनंद होतो. अशात लोक फोनचे Outer Look पाहतात. पण, अनेकदा पोर्ट, माइक, स्पीकर आणि कॅमेरा लेन्स या गोष्टींकडे लक्ष देत नाहीत. हे मोबाईलचे असे काही भाग आहेत. जे प्रत्येक स्मार्टफोनमध्ये अतिशय महत्वाचे असतात. Smartphone चार्जिंगमध्ये काही समस्या आहे का हे पाहण्यासाठी USB पोर्ट तपासण्याचे लक्षात ठेवा. त्याचप्रमाणे कुठेही कॉल करून फोनचा माइक आणि स्पीकरही तपासा. कॅमेऱ्यांसह फोटो घेऊन कॅमेरा लेन्स तपासा.
- स्मार्टफोन खरेदी करण्याची हौस प्रत्येकाला असतो. दुसरीकडे, जेव्हा सेकंड हँड फोन हे तुमचे आवडते मॉडेल असते आणि ते अत्यंत कमी किमतीत उपलब्ध असते , तेव्हा आनंद वेगळाच असतो.अशात अनेकदा लोक बाहेरून फोन पाहतात. पण, ऑपरेट करून पाहत नाहीत. असे करू नका. तुम्ही फोन खरेदी करत असाल तर तो फोन किमान १५ मिनिटे सतत चालवा. असे केल्याने फोनची प्रोसेसिंग पॉवर, फ्रेम रेट, हँगिंग प्रॉब्लेम इत्यादी माहिती होते. आजकाल तुम्ही स्मार्टफोनमधील बॅटरी काढू शकत नाही, परंतु, काही वेळ फोन सतत चालवल्यानंतर हिटिंग सारख्या समस्या येतात का ते पाहा.
- आजकाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय ऑनलाइन झाला आहे. अशा अनेक वेबसाइट्स आणि री-कॉमर्स मार्केट प्लेसेस आहेत. जे वापरलेले सेकंड हँड स्मार्टफोन विकण्याचे काम करतात. सोशल मीडियावरही सेकंड हँड फोनचे विक्रेते आणि खरेदीदार सहज सापडतात. जर तुम्हीही असा फोन विक्री आणि खरेदी करणार असाल तर असा व्यवहार समोरासमोर करण्याचा प्रयत्न करा. जर खरेदीदार आणि विक्रेता सोसायटीच्या किंवा परिसरात भेटले तर ते अधिक चांगले आहे. अनेकदा ऑनलाइन केलेल्या गोष्टी आणि आश्वासने नंतर चुकीची ठरतात. त्यामुळे असे केल्याने समोरच्या व्यक्तीची फसवणूक होण्याची शक्यता कमी होते.



# नजर हटी, दुर्घटना घटी !

**तंत्रज्ञानामुळे सर्वसामान्यांची अनेक कामे हलकी झाली आहेत. मात्र सुविधा मिळत असतानाच तंत्रज्ञानाचा गैरफायदा घेण्याचे प्रकारही दिवसेंदिवस वाढत आहेत. देशातील अनेक शहरांमध्ये ऑनलाइन फसवणुकीच्या शेकडो घटना घडत आहेत. फसवणुकीला बळी पडण्यापूर्वीच थोडीशी काळजी घेतल्यास पुढील त्रास टळू शकतो. त्यामुळेच इंटरनेटशी जोडलेली कोणतीही यंत्रणा वापरताना आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी थोडी खबरदारी घेणे गरजेचे आहे.**



फोन करणाऱ्या व्यक्तीने बँकेचा, कुठल्याही खात्याचा, कंपनीचा ऑफिसर असल्याचे सांगितले, तरीही 'ओटीपी' (वन टाइम पासवर्ड) देऊ नये. यूपीआय पिन, एटीएम-डेबिट-क्रेडिट कार्ड यांचा पिन, तसेच सीव्हीव्ही (मागील बाजूस असलेला तीन आकडी कोड), बँक खाते क्रमांक कोणालाही देऊ नये. यूपीआयद्वारे पेमेंट करताना नाव 'व्हेरिफाय' आहे का, हे तपासून बघावे. यूपीआय पिन, क्यूआर कोड स्कॅन करणे हे पैसे देताना करावे लागते. आपल्याला पैसे मिळण्यासाठी कधीच करावे लागत नाही. जुन्या वस्तू एखाद्या साइटवरून ऑनलाइन विकताना समोरचा फसवा माणूस 'पैसे पाठवता येत नाहीत' वगैरे सांगून क्यूआर कोड स्कॅन करण्यास सांगेल. मात्र, हा प्रकार पैसे लुबाडण्यासाठी असतो, हे ध्यानात ठेवले पाहिजे. सायबर चोरटे फोन करून, बोलण्यात गुंतवून ओटीपी किंवा पिन मागणे, क्यूआर कोड स्कॅन करणे याची घाई करतात. त्या वेळी थेट फोन बंद करा आणि जाणकारांकडून माहिती घ्या.



## तक्रार करा...

सायबर सेलकडे तक्रार करण्यासाठी पुढील साइटवर जावे. https://cybercrime.gov.in/ तिथे पुढील नाव दिसेल - राष्ट्रीय साइबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल (National Cyber Crime Reporting Portal). इथे ऑनलाइन तक्रार नोंदवता येते. याशिवात पोलिस स्टेशनमध्येही जाऊ शकता. १९३० हा सायबर सेलचा हेल्पलाइन नंबर आहे. प्रत्येक राज्याचे पोलिस दल हा चालविते. याशिवाय धार्मिक कार्य करण्यामध्येही लाखोंचा फटका मिळाल्याचे समजते. परदेशी जाणे, लग्न करणे, फ्लॅट घेणे असे आयुष्यातील मोठे निर्णय घेतानाही सावधगिरी बाळगावी लागते. अशावेळी निःसंकोच चौकशी करावी. ऑनलाइन व्यवहार, ॲपद्वारे व्यवहार ही जशी सोय आहे, तशीच जबाबदारीही आहे. सतत सावध राहणे आवश्यक आहे. नजर हटी, दुर्घटना घटी!

## मर्यादाच निश्चित करा...

एटीएम- डेबिट- क्रेडिट कार्ड यांच्या दैनंदिन वापराची मर्यादा निश्चित करता येते. उदाहरणार्थ, एटीएममधून एका दिवसात १० हजार रुपये किंवा अमुक रकमेच्या वर पैसे निघणार नाहीत, एका दिवसात फक्त अमुक रकमेच्या मर्यादेपर्यंतच ऑनलाइन व्यवहार करता येतील इत्यादी. परदेशात जाणार नसल्यास कार्डाचा इंटरनॅशनल वापर बंद करून ठेवावा. एटीएम सेंटरमध्ये पैसे काढताना अनोळखी माणसाची मदत घेऊ नका. लोभ व भीती ही फसवणूक होण्याची मुख्य दोन कारणे आहेत. रक्कम किंवा फायदा होणार असल्याचे प्रलोभन दाखवले जाते किंवा सेवा खंडित होईल अथवा नुकसान होईल अशी भीती दाखवली जाते आणि त्यातून या घटना घडतात. केवायसी अपडेट करण्याबाबत मेसेजेस, मेल पाठवणे किंवा फोन करून फसवणूक करणे हे अधिकृत असल्याची खात्री ऑफिसला, बँकेला भेट देऊन करा.

## अनोळखींसोबत ओळख...

काही प्रकारांमध्ये सोशल मीडियावरील भारतीय अथवा परदेशी व्यक्तीबरोबर ओळख होते. त्यानंतर या व्यक्ती ओळख वाढवून विश्वास संपादन करतात आणि भलीमोठी रक्कम देण्याचे आमिष दाखवून प्रोसेसिंग फीच्या नावाखाली थोडे थोडे करून पैसे उकळतात. फिशिंग ई-मेल्स या प्रकारात बँक, रिझर्व्ह बँक, प्राप्तिकर खाते किंवा सरकारी विभाग यांच्या नावाने गुन्हेगार मेल पाठवतो आणि आपल्या बँक खात्याचा, वैयक्तिक तपशील मागतो किंवा एक लिंक देऊन, त्या लिंकवर तपशील अपडेट करण्यास सांगतो. कोणतीही बँक, रिझर्व्ह बँक किंवा प्राप्तिकर खाते असे तपशील कधीही, कोणत्याही परिस्थितीत मागत नाहीत. काही वेळा 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने तुमच्या सुरक्षिततेसाठी एक नवी सिस्टीम सुरू केलेली आहे, मेलमध्ये दिलेल्या लिंकवर क्लिक करा व तुमचे खाते असलेली बँक निवडा,' अशी फ्रॉड मेल येते. रिझर्व्ह बँक देण्याघेण्याचे व्यवहार करीत नाही. व्यवसाय किंवा कारणाव्यतिरिक्त आपला फोन नंबर सोशल मीडियावर कधीही देऊ नये.

## ती ललना...

अनोळखी नंबरवरून आलेल्या व्हिडीओ कॉलवर काही वेळा बोलता बोलता स्त्री कपडे काढते व त्याचे रेकॉर्डिंग केले आहे सांगून धमकी दिली जाते. 'बदनामी नको असेल, तर पैसे द्या,' अशी मागणी केली जाते. अशा वेळी सायबर सेलकडे तक्रार करावी. विमा पॉलिसीच्या फसवणुकीचा एक प्रकार काही वर्षांपूर्वी वाढला होता. अशा फोनवर विश्वास न ठेवता विमा कंपनीच्या ऑफिसात किंवा विमा एजंटकडे चौकशी करू शकता. 'तुमच्या खात्यात जी रक्कम जमा होईल, त्याच्या काही टक्के कमिशन मिळेल,' अशा आमिषाला बळी पडू नये. सायबर कॅफेमधून बँकेचे ऑनलाइन व्यवहार करू नयेत; वाचनालय, मॉल इत्यादी ठिकाणचे फ्री वायफाय वापरू नये. सार्वजनिक ठिकाणी दुसऱ्याच्या चार्जरने फोन चार्ज करू नये; तसेच फोन दुसऱ्याच्या हातात देऊ नये. याबरोबरच लॉगइन आयडी, यूजर आयडी आणि पासवर्ड इतरांना सांगू नये. पासवर्ड सोपा न ठेवता नियमितपणे बदलावा.

## टोटल इंटरनेट सिक्युरिटी

ॲड्रेस बारमध्ये उजवीकडे पॅडलॉकचे (कुलपाचे) चित्र, तसेच सुरक्षित साइटचा ॲड्रेस HTTPS:// ने सुरू होतो, ती साइट सुरक्षित समजावी. संगणकावर ॲंटिव्हायरसऐवजी टोटल इंटरनेट सिक्युरिटी वापरावी. यात फायरवॉल असते; शिवाय ऑनलाइन ॲटॅकपासूनही ते बचाव करू शकतात. हे फ्री मिळते; मात्र त्याऐवजी 'पेड' घेतल्यास जास्त संरक्षण मिळते. बँक खात्यातून रक्कम वजा किंवा जमा झाली, तर त्याचे मेसेज लगेच मिळतील याची तजवीज करावी. मेल-मेसेजमधील लिंकवर क्लिक करून ॲप डाउनलोड करणे धोक्याचे आहे. असे ॲप आपल्या मोबाइलचा ताबा त्यांच्या हातात घेऊन, सगळी माहिती त्यांना मिळवतात आणि आर्थिक नुकसान करू शकतात. याला 'रिमोट कंट्रोल ॲप' म्हणतात. सरकारच्या किंवा कंपन्यांच्या नवीन योजनांबाबत लोकांना माहिती नसते. त्याचा फायदा घेऊन फसवणूक करण्याची पद्धत आहे. वीजबिलाचे पैसे न दिल्यास रात्री दहाला वीज खंडित केली जाणार, असा मेसेज पाठवून फसवणूक सुरू आहे. अशा मेसेजवर विश्वास ठेवू नये. ज्या नंबरवरून असे फ्रॉड मेसेज पाठवले जातात किंवा फोन येतो ते नंबर ब्लॉक करा.

## जास्त परताव्याचे आमिष

शेअर मार्केट व म्युच्युअल फंड यातून दीर्घकाळात चांगला लाभ मिळतो; परंतु त्यात हमी नसते. कोणी हमीबद्ध परतावा देण्याचे सांगत असेल, तर काहीतरी घोळ आहे हे लक्षात घ्या. नोकरीचे आमिष दाखवून पैसे उकळणेही सुरू असते. केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीसाठी आधी जाहिरात निघते, परीक्षा होते, मुलाखत होते, मग निवड केली जाते. पैसे देऊन नोकरी मिळत नाही. खासगी कंपन्यांत तर नाहीच. तेव्हा जागरूक राहणे, विश्वास न ठेवणे हाच मार्ग आहे. कधी मोठ्या कंपन्यांच्या बनावट वेबसाइट बनवून, त्यावर नोकरीच्या जाहिराती टाकून फसवणूक केली जाते. वर्तमानपत्रातून फसवणुकीच्या बातम्या येतच असतात. त्या बारकाईने वाचाव्यात.

# सिक्रेट ई-मेल पाठवायचा ?


जीमेल भारतातील लोकप्रिय ई-मेल सर्व्हिस आहे, जिचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. जीमेलमध्ये अनेक उपयुक्त फीचर्स आहेत, यात नवीन फीचर्सची भरदेखील टाकली जाते. परंतु जीमेलचे अनेक असे फीचर्स आहेत जे बहुतांश युजर्सना माहीतच नाहीत. अशाच एका सीक्रेट फीचरची माहिती आज आम्ही तुम्हाला देणार आहोत. अनेकदा आपण जीमेलच्या माध्यमातून समोरच्या व्यक्तीला अशी माहिती शेयर करता जी खूप संवेदनशील असते. त्या माहितीचा गैरवापर कोणीही करू नये असे तुम्हाला वाटते. अशा संवेदनशील मेलसाठी Gmail कड़े एक फिचर आहे ज्याचं नाव आहे Confidential Mode. या मोडच्या माध्यमातून पाठवण्यात आलेला ई-मेल खूप सुरक्षित असतो, ज्याचा कोणीही गैरवापर करू शकत नाही. Confidential Mode मध्ये तुम्ही मेल सीक्रेट कोड व एक्सपायरी डेट सेट करून पाठवू शकता. तुम्ही ठरवलेल्या तारखेनंतर तो मेल आपोआप जीमेलमधून डिलिट होईल. तसेच तो मेल ॲक्सेस करण्यासाठी एक सीक्रेट पासकोड टाकावा लागेल. चला जाणून घेऊया मेलमध्ये कशी सेट करायची एक्सपायरी डेट आणि पासकोड.

## कॉन्फिडेन्शियल ई-मेल

सर्वप्रथम तुमच्या स्मार्टफोनमध्ये Gmail ओपन करा. त्यानंतर Compose Mail वर क्लिक करा. त्यानंतर तुम्हाला हवा तो मजकूर लिहा. मेल लिहल्यानंतर टॉप कॉर्नरवरील ३ डॉट मेन्यूवर क्लिक करा. तुमच्यासमोर एक नवीन विंडो ओपन होईल. तिथे Confidential Mode चा टॉगल दिसेल, ऑन करा. त्यानंतर तुम्ही इथे मेलची एक्सपायरी डेट देखील टाकू शकता, ज्यात तुम्ही १ दिवसापासून ५ वर्षांपर्यंतचा कालावधी सेट करू शकता. त्याचबरोबर Passcode सेट करण्याचा देखील पर्याय मिळेल तिथून मेल मध्ये पासकोड सेट करा. त्यानंतर मेल सेव्ह करून सेंड करा. ही प्रोसेस फॉलो करून तुम्ही Gmail वर कोणताही मेल गुप्तरित्या पाठवू शकता. जो तुम्ही सेट केलेल्या पासकोडनेच ॲक्सेस करता येईल. तसेच ही तुम्ही या मेलमध्ये एक्सपायरी डेट सेट करून, तो कायमचा डिलिट होईल हे पाहू शकता. पण एक गोष्ट लक्षात असू द्या की हा मेल सेट केलेल्या कालावधीनंतर डिलिट जरी झाला तरी या मेलचे स्क्रिनशॉट घेता येतात.



# Gmail वापरताना या गोष्टींकडे करू नका दुर्लक्ष




**Gmail हे सध्या जगातील सर्वाधिक वापरले जाणारे ई-मेल प्लॅटफॉर्म आहे. पण, ते वापरताना तुम्ही या तीन गोष्टींकडे दुर्लक्ष केले तर, तुमचे जी-मेल अकाउंट कायमचे बॅन होऊ शकते.**

Gmail ही जगातील सर्वाधिक वापरली जाणारी ई-मेल सेवा असून जगभरात लाखो युजर्स ही ई-मेल सेवा वापरतात. पण, Gmail चे तीन सोपे नियम फॉलो न केल्यास तुमचे Account कायमचे बॅनदेखील होऊ शकते. Google ने गेल्या काही वर्षांत आपल्या ई-मेल सेवेत अनेक बदल केले आहेत. युजर्सना मेल पाठवल्यानंतर तो पूर्ववत करण्याची सुविधा मिळाली आहे. तसेच, त्याचा इंटरफेसदेखील बदलण्यात आला आहे. Gmail च्या तीन सोप्या नियमांबद्दल जाणून घेऊया...

- एकापाठोपाठ एक ई-मेल पाठवणे : Google ने Gmail साठी ई-मेलिंगसाठी मर्यादा निश्चित केली आहे. तुम्ही १०० लोकांना एका मेलमध्ये एकत्र ठेवल्यास, Google चे अल्गोरिदम अलर्ट जारी करते. तुम्ही तुमच्या Gmail वरून एका दिवसात ५०० पेक्षा जास्त ईमेल पाठवू शकत नाही. हे केल्यास तुमच्यावर १ ते २४ तासांसाठी बंदी घातली जाऊ शकते. तसेच, तुम्ही हे सतत करत असल्याचे आढळल्यास, तुमच्या जीमेलवर कायमची बंदी घातली जाऊ शकते.
- वारंवार चुकीचा Email - Address वापरणे : तुम्ही Inactive Email Address वर मोठ्या प्रमाणात Message पाठविल्यास, Google तुमचे खाते Red Flag करू शकते. असे केल्यास Google चे अल्गोरिदम तुम्हाला स्पॅमर मानतील आणि तुमचे Gmail खाते डिसेबल किंवा तात्पुरते प्रतिबंधित केले जाऊ शकते. ई-मेल पाठवल्यानंतर, मोठ्या प्रमाणात बाऊन्स मेल प्राप्त झाल्यास, तुम्हाला स्पॅमर मानले जाईल. अशात, ई-मेल पाठवण्यापूर्वी सर्व Email Address नीट तपासून घ्यावेत आणि स्पेलिंग वगैरे तपासून घ्यावेत. जेणेकरून ई-मेल पाठवल्यानंतर परत येणार नाही.
- ई-मेलद्वारे बेकायदेशीर कन्टेन्ट- मटेरियल पाठवणे : तुम्ही एखाद्याला बेकायदेशीर लिंक्स, व्हिडिओ, फोटो किंवा दस्तऐवज, Gmail च्या धोरणाच्या विरोधात पाठवले तरीही तुमचे खाते बॅन केले जाऊ शकते. शस्त्रे विक्री आणि खरेदी, अमली पदार्थांची तस्करी, कॉपीराइट केलेले संगीत व्हिडीओ आणि चित्रपट इत्यादी बेकायदेशीर कन्टेन्टबद्दल ई-मेलद्वारे माहिती पाठविण्याचा प्रयत्न करू नका.



## शॉर्ट न्यूज

### शिर्डी, नगरमधील तिघे जेरबंद

**शिर्डी :** हद्दपार आदेशाचा भंग करून जिल्ह्यात वास्तव्य करणाऱ्या शिर्डी व अहिल्यानगर मधील तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले आहे. विशाल मायकल मोकळ (रा. आंबेडकरनगर, राहाता), सागर भाऊसाहेब गायकवाड (रा. नवीन बाजारतळ, बिरोबा रस्ता, शिर्डी) व सलमान मेहबुब खान (रा. कोठला, घासगल्ली, अहिल्यानगर) अशी जेरबंद केलेल्या तिघांची नावे आहेत. त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अंतर्गत शिर्डी व तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### महाविद्यालयीन तरुणीचा विनयभंग

**श्रीरामपूर :** एका महाविद्यालयातील तरुणीला बळजबरी गाडीवर बसून नेऊन लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन केले. तसेच पुन्हा पीडितेला घरी नेऊन सोडत, या प्रकाराबद्दल कुणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात पोस्को, विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश डौले करीत आहे.

### तिसगावमधील कत्तलखान्यावर छापा

**पाथर्डी :** तिसगाव (ता. पाथर्डी) येथील कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा घालून कारवाई केली. आठ जणांविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ७० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. सद्दाम हारूण शेख (वय २८), इरफान गफुर शेख (वय ३२ दोघे रा. तिसगाव, ता. पाथर्डी), रिजवान मोहमंद शेख (वय ३७), आसिफ याकूब सय्यद (वय ४०), वसीम मोहमंद कुरेशी (वय ३२), आदिल अमिन कुरेशी (वय २१, तिघे रा. सदर बाजार, भिंगार), जावेद हारूण शेख (वय २७, रा. तिसगाव, ता. पाथर्डी) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत.

### राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत वेदिका प्रथम

**अकोले :** येथील अभिनव पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीयस्तर नृत्य स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन नेत्रदीपक कामगिरी केली. इयत्ता तिसरीतील वेदिका सुनील एरंडे हिने बॉलिवूड स्टाईलमध्ये प्रथम क्रमांक, पाचवीतील आराध्या महेश शिंदे हिने सेमी क्लासिकल डान्समध्ये प्रथम क्रमांक मिळविला. आठवीतील वैभवी सचिन देशमुख हिने फोक डान्समध्ये तृतीय क्रमांक, तर नववीतील प्रिया अरुण कोंडावळे हिने फोक डान्समध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या विद्यार्थिनींना नृत्यशिक्षिका काव्या कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

### पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु करा

**संगमनेर :** लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी पाठपुरावा करून संगमनेर तालुक्यातील विविध पाणीपुरवठा योजनांकरिता सुमारे ८०० कोटी रुपये निधी मंजूर करून काम सुरू केले. मात्र सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी राजकीय हेतू ठेवून अनेक कामे बंद पाडली आहेत. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय होत असून चंदनापुरी, झोळे व हिवरगाव पावसा या जलजीवन योजनेतील पाणीपुरवठा योजनेचे बंद असलेले काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी सरपंच भाऊराव राहणे यांनी केली असून तातडीने काम न सुरू झाल्यास आत्मदहनाचा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

# लावणी कलेच्या जागी बिभत्सपणा पसरवला जात आहे

**लोककला जगली पाहिजे । सांस्कृतिक विभागाकडून नवी नियमावली जारी होणार**



**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील लोककला जगली पाहिजे. महाराष्ट्रातील लोकनाट्य केंद्रांवर पारंपरिक वाद्ये वाजली जावीत, यासाठी संस्कृतिक कार्य विभागाकडून नियमावली तयार करण्यात येईल. तसेच महसूल आणि पोलिस यंत्रणेने याकामी आवश्यक ती तातडीची पावले उचलण्यात येतील, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिली आहे.**

महाराष्ट्रातील लोक कलाकारांच्या विविध मागण्यांसाठी मंत्रालयात सोमवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर मंत्री आशिष शेलार यांनी लोककला केंद्रांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून नियमावली तयार केली जाणार असल्याचे सांगितले. तसेच, त्यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

बैठकीत बोलताना आशिष शेलार म्हणाले, लावणी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कलाकारीच उत्तम आणि लोकप्रिय नृत्याविष्कार आहे. त्यामुळेच, कित्येक वर्षानंतरही लावणीची मोहिनी प्रेक्षकांवर कायम असून ग्रामीण भागात आजही यात्रा, जत्रा आणि विशेष कार्यक्रमांमध्ये लावणीचा नृत्यप्रकार पाहायला मिळतो. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात आजही लोकनाट्य कला केंद्रावर लावणीची खास फर्माईश होते, व लावणी कलेचा नजराना पाहून चाहत्यांची विशेष दाद दिली जाते. मात्र, गेल्या काही वर्षात लावणी कला लोप पावत असून लावणीच्या जागी विभत्सपणा पसरवला जात आहे. पुढे आशिष शेलार म्हणाले, लोकनाट्य केंद्रावर डी.जे.तसेच व साउंड सिस्टीम सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या कला केंद्राचे काम अटी व शर्तीनुसार होत नसेल तर जिल्हाधिकारी आणि पोलिसांनी योग्य ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र कला केंद्रांमध्ये लोकनाट्य व पारंपारिक लावणी शो मध्ये कलाकारांची कमतरता आहे. त्यामुळे, या कला केंद्रांसाठी नवीन कलाकार तयार व्हावेत यासाठी स्व.पद्मश्री श्रीमती यमुनाबाई वाईकर यांच्या नावे प्रशिक्षण सुरु करण्यात येणार असल्याची माहिती शेलार यांनी दिली आहे.

दरम्यान, कोल्हापूर येथे लवकरच भव्यदिव्य वस्तुसंग्रहालय बांधण्यात येणार असल्याची देखील माहिती आशिष शेलार यांनी दिली आहे. कोल्हापूर हे मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक महत्त्वाचे केंद्र आहे. याच सांस्कृतिक वारशाचे जतन व्हावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या वस्तुसंग्रहालयात चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील महत्त्वाचे दस्तऐवज, जुने चित्रपट, चित्रपटांचे पोस्टर्स, कॅमेरे, वेशभूषा, स्क्रिप्ट्स अशी विविध स्मृतिचिन्हे ठेवण्यात येईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे.

# राष्ट्र घडण्यात माता रमाई यांचे मोठे योगदान

**युवा नेते विवेक कोल्हे यांचे प्रतिपादन**



**कोपरगाव : प्रतिनिधी**

**त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात आयोजित मिरवणुकीत युवा नेते विवेक कोल्हे सहभागी झाले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे राष्ट्रपुरुष आपल्या देशात घडले त्यांच्या अद्वितीय कार्याच्या मागे माता रमाई यांनी केलेला त्याग हा अविस्मरणीय आहे. या महान त्यागामुळे गौरवशाली राष्ट्र घडते आहे. कारण प्रतिकूल काळात त्याग आणि समर्पणाची ज्योत त्यांनी प्रज्वलीत केली. त्यामुळेच आजचे सुवर्णक्षण देशाला लाभले, अशी भावना विवेक कोल्हे यांनी व्यक्त केली.**

याप्रसंगी आंबेडकरी चळवळीचे नेते जितेंद्र रणशूर, अध्यक्ष योगेश शिंदे, उपाध्यक्ष गौतम रणशूर, अतुल गुंजाळ, विवेक पगारे, नीलेश वाघ, राजेंद्र उशिरे, मिरवणूक प्रमुख वैभव रणशूर आर्दीसह शंकर बिऱ्हाडे आणि समाज बांधव, भगिनी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सर्व जडणघडणीत पाठबळ रमाई यांनी दिले. सोन्याच्या दागिन्यापेक्षा वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दोन घास मिळावे, याला महत्व देणाऱ्या मोठ्या विचारांच्या रमाई होत्या. त्यांनी समाजासाठी बाबासाहेबांच्या रूपाने एक मौल्यवान महापुरुष पुढे येत असताना त्यांना मोलाची साथ दिली. माता रमाई यांचे कार्य, त्याग आणि समर्पण यांचे स्मरण नव्या पिढीला असावे, यासाठी कोपरगाव शहरात सकल आंबेडकरी समाजाच्या वतीने निघालेल्या रथयात्रेत सहभागी होत विवेक कोल्हे यांनी अभिवादन केले.

# १७ लाख रुपयांची रोकड लुटणारा आणखी एक आरोपी जेरबंद

**स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई**



**नगर : प्रतिनिधी**

**राहुरी तालुक्यातील ब्राह्मणी येथील मुळा ॲग्रो प्रोडक्ट कंपनीचे १७ लाख रुपये बँकेत भरणा करण्यासाठी चाललेल्यांना लुटणारा आणखी एक आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे येथून ताब्यात घेतले. त्याला पुढील तपासासाठी राहुरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.**

ऋषीकेश अनिल कुसळकर, (वय २१, रा.राजलक्ष्मी निवास, बाळकृष्ण नगर, पेठ रोड, पंचवटी नाशिक) असे ताब्यात घेतल्या आरोपीचे नाव आहे. या गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यापूर्वी सचिन राजेंद्र वायदंडे (वय २४, रा. सम्राटनगर, नागापूर), शुभम मनोज गुळसकर (वय २४, रा. बोल्हेगाव), अभिषेक लक्ष्मण जाधव (वय २४, रा. नवनागापूर) यांना ताब्यात घेतले होते.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार या गुन्ह्यातील पसार असलेल्या संशयित आरोपी कुसळकर हा पुणे येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपी ताब्यात घेतले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात उंदरांचा हैदोस !

**२ विद्यार्थ्यांना रेबीजची लागण । वसतिगृहाचा निष्काळजीपणा । विद्यार्थी संघटना आक्रमक**

**पुणे : प्रतिनिधी**

**पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठ वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आले आहे. विद्यापीठात सध्या उंदरांचा सुळसुळाट झाल्याचे पाहायला मिळत आहे. विद्यापीठातील वसतिगृह क्रमांक ६ मध्ये २ विद्यार्थ्यांना रेबीजची लक्षणे आढळून आली आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या साहित्याचे देखील या उंदरांनी नुकसान केले आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माहेरघरात हा चर्चेचा विषय ठरत आहे.**



या घटनेवरून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आक्रमक झाल्याचे दिसत आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून तीन महिन्यांपूर्वी मुख्य वसतिगृह प्रमुखांना उंदरांच्या बाबतीत तक्रार देखील देण्यात आली होती. तरीसुद्धा यावर विद्यापीठ प्रशासनाकडून कोणतीच दाखल घेण्यात आली नाही. यावरून विद्यापीठाच्या वसतिगृह प्रशासनाचा निष्काळजीपणा उघड झाल्याचा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केला आहे.

तीन महिन्यांपूर्वी हिंदी विभागाचे आणि अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी मुख्य वसतिगृह प्रमुखांना भेटण्याचा प्रयत्न करत आहेत, तरी एकदाही या विषयाची दखल घेतली गेली नाही, असा देखील आरोप आता विद्यार्थ्यांकडून करण्यात आला आहे. वसतिगृहातील उंदरांनी एका विद्यार्थ्याच्या पायाला सलग चार वेळा चावा घेतला आहे. त्यामूळे, त्या विद्यार्थ्याला २ दिवस रुग्णालयात दाखल केले होते. त्यामधे रेबीज या रोगाची लक्षणी आढळून आली आहेत.

दरम्यान, उंदरांनी विद्यार्थ्यांच्या खाण्याच्या पदार्थांची देखील नासधूस केली असून सर्व पुस्तके व इतर समान कुरतडले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे तातडीने नवीन रूम उपलब्ध करून द्यावी, सर्व रूममध्ये पेस्ट कंट्रोल करून द्यावे, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. तसेच दाखल न घेतल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू, असा इशारा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने दिला आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# होती है देर जीने में



घाई! घाई!! आजकाल ज्याला त्याला घाई झालेली आहे. बस गाडी पकडायची घाई, रेल्वे गाडी पकडायची घाई... गाडी पकडली तर जागा पकडायची घाई. आपल्या स्वतः च्या वाहनाने ड्रायव्हिंग करीत असला तर पुढच्या वाहनाला ओव्हरटेक करायची घाई.
घाईच घाई! काय करणार?
हा जमानाच घाईचा आहे. सरकार जनतेला चेतावणी देते, वाहने हळू चालवा, अती घाई संकटात नेई, वेग पाळा; अपघात टाळा.... पण अपघात होतातच. कोण जिवाला मुकतो, कोणाचा पाय मोडतो, हात मोडतो. हे माणसाचे आंशिक मरणच होय. या खासियतीवर महान उर्दू शायर फ़िराक़ गोरखपुरी यांचा सुंदर शेर आहे. ते म्हणतात,

हवा है गर्मो तेज़ सीने में।
होती है देर जीने में।।

धापा टाकीत चालला आहे.
धावणाऱ्या बसच्या मागे धावत आहे.
धावता धावता ओरडत आहे , अरे मला गाडीत घ्या. अरे मला गाडीत घ्या. मला जगायला उशीर होतोय. मला लवकर लवकर जगून घ्यायचे आहे.
लवकर लवकर जगणे म्हणजेच लवकर लवकर मरणे. मरण लवकर ओढून घेणे. हाच भावार्थ आहे या उर्दू शेराचा.
फ़िराक़ गोरखपुरी साहेबांचा हा मोठा नाजूक शेर आहे. सर्वांना तो आकलन व्हावा म्हणून तपशिलवार लिहिले आहे. नाही तर

मेरी लिखी बात को हर कोई
समझ नहीं पाता क्योंकि
मैं अहसास लिखता हूं और
लोग अल्फ़ाज़ पढ़ते हैं

गुलज़ार हे उर्दू शायर म्हणतात, मी लिहिलेले सगळेच समजू शकत नाहीत. कारण मी भावना लिहितो आणि लोक शब्द वाचतात. असे नको व्हायला!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### खा. लंकेंचा व्हिडीओ कॉल आणि आंदोलकाच्या मागण्या मान्य !

समस्येला प्राधन्य देत तात्काळ व्हिडीओ कॉल करून आंदोलकांशी संवाद साधला व त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचा तात्काळ उपाययोजना करण्याच्या सुचना दिल्या.
या आंदोलनात आदीनाथ काळे, सोमनाथ हरेल, सतीश थोरात, बाबाभाई शेख, भीमराव आहेर, परळहाद भिसे, भारत भेळेकर, हरिभाऊ दरंदले, अरूण सासे, भीमराम मोकट, कैलास पाथरे, संतोष पाथरे, एस.बी.शेटे,आबासाहेब लोकहंडे, ज्ञानेश्वर जारे, शशिकांत वाघ, जालिंदर ढेरे, बद्रीनाथ खांडगळे, अप्पासाहेब खंडगळे, रावसाहेब काळे, बाळासाहेब काळे, संतोष बोरूडे हे सहभागी झाले होते.

**प्रशासनाचे लेखी आश्वासन**

चार किलोमीटरच्या पट्ट्यात तातडीने वेग नियंत्रीत करणारे स्पिड ब्रेकर, मार्गदर्शक फलक लावण्यात येतील, या भागाला अपघात प्रवण क्षेत्र घोषित करून सुरक्षेसाठी आवष्यक उपाययोजना करण्यात येतील. स्पीड कॅमेरे, अपघात टाळण्यासाठी आवष्यक दिशादर्शक फलक तसेच इन्फ्रास्ट्रक्चर सुधारण्याची प्रक्रिया लवकर सुरू करण्यात येईल. पहिल्या टप्प्याचे काम शुक्रवारपर्यंत पुर्ण करण्यात येईल.

# प्रत्येक गावात पोपटरावांसारखा परीस असावा!

## अभिनेत्री राजश्री लांडगे यांचे प्रतिपादन



■ हिवरे बाजार येथील यशवंत विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात अभिनेत्री राजश्री लांडगे यांनी मार्गदर्शन केले.

हिवरे बाजार : प्रतिनिधी

**हिवरेबाजारच्या रूपाने आदर्श गाव उभे करणारे पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासारखा परीस प्रत्येक गावात असावा सर्वांचे सोने होईल असे प्रतिपादन मराठी चित्रपट अभिनेत्री राजश्री लांडगे यांनी केले.**

हिवरे बाजार येथील यशवंत माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून लांडगे या बोलत होत्या. पद्मश्री पोपटराव पवार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस, महानगरपालिकेचे कॅफो सचिन धस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापक मुरलीधर अमृते यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सचिन धस यांनी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात संधी शोधण्याचा सल्ला देत शुभेच्छा दिल्या.

पद्मश्री पोपटराव पवार यांना परीसाची उपमा देत यावेळी बोलताना राजश्री लांडगे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनो तुम्ही खूप भाग्यवान आहात. त्यांच्याजवळ राहून तुम्ही स्वतः चे सोने बनवा. त्यांच्यात देवाचा अंश आहे. त्यांच्यापासून सकारात्मक उर्जा मिळते. प्रत्येक गावात पोपटरावांसारखा परीस असावा, सर्वांचे सोने होईल असा आशावाद लांडगे यांनी व्यक्त केला. यावेळी लांडगे यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात ताम्हण वृक्षाचे रोपण करण्यात आले.

यावेळी पिंपळगांव वाघाच्या सरपंच सुलोचना नाट, भोयरे खुर्दचे सरपंच राजूशेठ आंबेकर, चेअरमन छबुराव ठाणगे, हरीभाऊ ठाणगे, एस.टी. पादीर, बाबासाहेब गुंजाळ, वसंतराव कर्डीले, सहदेव पवार, रो ना पादीर व शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

### यश तुमच्या मागे धावेल !

विद्यार्थ्यांनो जीवनात सकारात्मक विचार करा. आपल्यातील कौशल्य शोधा, त्याग करा, यश तुमच्या मागे धावेल असा विश्वास व्यक्त करत माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### संस्कार व बौध्दिक ज्ञानाला महत्व हवे

यश प्राप्तीसाठी गुणात्मकतेला जितके महत्व दिले जाते तिकेच महत्व संस्कार व बौध्दिक ज्ञानाला दिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी नियमित व सातत्यपूर्ण अभ्यास करून स्वतःचे तसेच शाळेचे, गावाचे, देशाचे व आई वडीलांचे नाव उज्वल करावे.

पद्मश्री पोपटराव पवार

### वाहने, मोबाईलचा अतिरेक टाळा

वाहने तसेच मोबाईलचा अतिरेक न करता दहावीनंतर फक्त पाच ते सहा वर्षे आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी चांगला अभ्यास करा. यश तुमचेच असेल.

विमलताई ठाणगे
सरपंच, हिवरे बाजार

# १४ डिजिटल शाळांसाठी ३८ लाखांचा निधी

## आमदार काशिनाथ दाते यांची माहीती

पारनेर : प्रतिनिधी



**पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या विविध गावांतील १४ शाळा डिजिटल करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत राखीव निधीतून ३७ लाख ८० हजार रूपयांचा निधी मंजुर करण्यात आल्याची माहीती आमदार काशिनाथ दाते यांनी दिली. १४ शाळांना प्रत्यकी २ लाख ७० हजार रूपयांचा निधी प्राप्त होणार आहे.**

जिल्हा परिषदेच्या शाळांना शहरी भागाच्या धर्तीवर शैक्षणिक सुविधा असलेल्या साधनांचा उपयोग करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे एक अधुनिक स्वरूप प्राप्त होऊन इंटरनेट आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या माध्यमातून शिक्षण दिले जाणार आहे.

### विद्यार्थ्यांना भरारी घेता येईल

डिजिटल स्कुलमुळे शिक्षणाचे एक अधुनिक स्वरूप प्राप्त होउन इंटरनेट आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाणार आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे राहू नयेत यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. शाळा डिजिटल झाल्यानंतर शाळेची गुणवत्ता व मुलांचा शैक्षणिक दर्जा सुधारून स्पर्धेच्या युगात त्यांना अधिक भरारी घेता येईल.

आमदार काशिनाथ दाते, विधानसभा सदस्य

### कोणत्या शाळा होणार डिजिटल ?

तालुक्यातील १४ शाळांना प्रत्येकी २ लाख ७० हजार रूपयांचा निधी प्राप्त होणार असून त्या शाळा पुढीलप्रमाणे :
ढोकी, पिंपरीगवळी, पळवे बुद्रुक, धोत्रे बुद्रुक, खडकवाडी, सारोळा आडवाई, पळसपुर, पिंप्री जलसेन, म्हसोबा झाप, डोंगरवाडी, चिंचोली, गारखिंडी, हत्तलखिंडी व गटेवाडी


# शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धा

## शिवबा संघटनेचा पुढाकार । हजारो रूपयांची बक्षिसे

निघोज : प्रतिनिधी

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या तयारीची लगबग सुरू झाली असून शिवबा संघटनेच्या वतीने वकृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, बबनराव तनपुरे, राजू लाळगे, यश शेटे यांनी दिली.**

इयत्ता ५ वी ते ८ वी, इयत्ता ९ वी ते १२ वी व महाविद्यालयीन गटामध्ये ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून प्रत्येक गटासाठी हजारो रूपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन कार्य आणि विचार, मोबाईल हटवा बालपण वाचवा, किल्ले संवर्धन गरजेचे आहे का ? शिवजयंती कशी साजरी करावी ? महाराष्ट्राची आई जिजाऊ ते सिंधूताई सपकाळ, आजचा शेतकरी आणि कृषि कायदे, आम्हाला खरंच संभाजी महाराज समजले का ? शिवशाही व आजची तरूणाई हे विषय या स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहेत.



या स्पर्धेसाठी उपक्रम समितीची स्थापना करण्यात आली असून त्यात ज्ञानेश्वर कवडे, शिवव्याख्याते प्रा. ज्ञानेश्वर कवाद, शिवबा संघटनेचे पदाधिकारी राजू लंके, मळगंगा संगणक संस्थेचे यश शेटे यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ९९२२१३०८०९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कडूस येथे रब्बी ज्वारी शेती दिन साजरा

## ज्वारी काढणी पश्चात व्यवस्थापनाचे धडे

सुपा : प्रतिनिधी




**तालुक्यातील कडूस येथे कृषि विभागाच्या वतीने रब्बी ज्वारी पीक प्रात्यक्षिक शेतरी दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्वारी काढणी पश्चात व्यवस्थापन तसेच कृषि विभागाच्या विविध योजनांचे मार्गदर्शन करणयत आले.**

यावेळी सरपंच मनोज मुंगसे, सुप्याचे मंडल कृषि अधिकारी भवर, कृषि पर्यवेक्षक मुकुंद साबळे, कृषि पर्यवेक्षक विनोद सरोदे, कृषि सहाय्यक विक्रम दिवटे, ग्रामपंचायत सदस्य नारायण नरवडे यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

मंडल कृषि अधिकारी भवर, कृषि पर्यवेक्षक विनोद सरोदे, कृषि सहाय्यक विक्रम दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना ज्वारी पेरणीपासून ते काढणीपर्यंतचे मार्गदर्शन करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल याविषयी कृषि सहाययकांच्या नियोजनाखाली पीक प्रात्यक्षिकाचे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ज्वारीचे उत्पादन वाढण्यास मदत होणार असल्याचे कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### रब्बी ज्वारीला पसंती

खरीप ज्वारीपेक्षा रब्बी ज्वारीला ग्राहकांची अधिक पसंती असते. कारण रब्बी ज्वारीचे आहारातील महत्व, चांगला बाजार भाव तसेच उत्कृष्ट प्रतिचा कडबाही उपलब्ध होतो. कडसूमध्ये कृषि विभागाच्या वतीने हा प्रकल्प राबविल्याबद्दल कृषि अधिकाऱ्यांचे आभार.

मनोज मुंगसे
सरपंच, कडूस

# एमआयडीसीतील हल्लेखोर पकडले

## गाडी लावण्याच्या वादातून केला होता खुनाचा प्रयत्न

सुपा : प्रतिनिधी

**सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये वरूण बेव्हरेजेस या कंपनीमध्ये ट्रान्सपोर्टची गाडी अगोदर लावण्याच्या वादातून झालेल्या हल्ल्यात एक जण जखमी झाला. या प्रकरणी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर सुपा पोलीसांनी दोघांना जेरबंद केले.**



शनिवार दि.८ रोजी वरूण बेव्हरेजेस या कंपनीमध्ये फिर्यादी नितीन शिवाजी दिवटे रा. बाबुर्डी यांनी माल भरण्यासाठी स्वतःची गाडी अगोदर लावली. त्याचा राग येउन आरोपी सुमित वसंत शेळके व ऋषिकेश उर्फ साहिल प्रकाश लोंढे यांनी लोखंडी रॉडने ब्रिझा कारच्या काचा फोडून नुकसान केले. सुमित शेळके याने त्याच्याकडील चाकूने दिवटे यांच्या उजव्या खांद्याच्या खाली व उेव्या हातावर वार करत तु आमच्या गाडया अडवितो, तुझा बेत पाहतो, आमच्या नादी लागतो, तुला मारून टाकतो अशी धमकी देत खुनाचा प्रयत्न केला. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. सुपा पोलीस त्यांच्या मागावर होते.

यासंदर्भात पोलीसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपी सुमित वसंत शेळके वय २० रा. मंगलमुर्ती नगर शिरूर, जिल्हा पुणे, मुळ रा. पळवे खुर्द ता. पारनेर, व ऋषिकेश उर्फ साहिल प्रकाश लोंढे वय २६ रा. मंगलमुर्ती नगर शिरूर जि. पुणे यांना पहाटे पाच वाजता त्यांच्या राहत्या घरून ताब्यात घेण्यात आले.

या आरोपींना जेरबंद करण्यासाठी सुपा पोलीसांनी एक स्वतंत्र पथक तयार केले होते. मिळालेल्या माहितीनुसार पोलीसांनी सापळा लावून दोन्ही आरोपींना जेरबंद केले.

दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांना अटक करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमनाथ दिवटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मोनिका जोजाट, पोसई कानगुडे, खैरे, धामणे, मरकड, योगेश सातपुते, विकास गायकवाड यांनी ही कारवाई केली.

# अंबिका विद्यालयातील १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

## सुरेश गाडीलकर यांची उपस्थिती



देवीभोयरे : प्रतिनिधी

**देवीभोयरे येथील श्री. अंबिका विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्याचा निरोप समारंभ मोठया उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविद्यालयाचे विद्युत परमाणूशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रध्यापक सुरेश गाडीलकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.**

यावेळी बोलताना सुरेश गाडीलकर म्हणाले, इयत्ता बारावीनंतर उच्च पदवी शिक्षणात मुलींना अनेक संधी असतात. सीईटी, नीट आदरी अभियांत्रीकी व मेडिकल क्षेत्राच्या प्रवेश परीक्षा देऊन आपण आवडीच्या क्षेत्रात प्रवेश घ्यावा. पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन क्षेत्रातही अनेक संधी प्राप्त होतात. विशेषतः अभियांत्रीकी, वैद्यकिय, औषधनिर्माण शास्त्र व संगणकीय अशा विविध क्षेत्रात आपला ठसा उमटविता येतो. आजचे जग आर्टिफिशियल इंटेलिजन्सकडे चालले आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनाही काळानुरूप आपणास अद्ययावत करून घेणे गरजेचे असल्याचे गाडीलकर म्हणाले.
यावेळी संस्कार सावंत, गौरी मुळे, प्रतिक्षा वाढवणे, श्रावणी थरात यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य राजेंद्र वाघ यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला.
यावेळी रसायनशास्त्राचे शैलेश हासे, जीवशास्त्राच्या मेघा उहे, इंग्रजीच्या गीतांजली शिंदे, मराठीचे गोविंद बेलोटे, लॅब टेक्निशियन संजय जाधव, सुदाम म्हस्के, परंडवाल यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.विद्याथनी तेजस्विनी बेलोटे हिने सुत्रसंचलन केले तर विद्याथनी मोहिनी दुधावडे हीने आभार मानले.

# सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन कठोर परिश्रम करा

## पोलिस उपाधीक्षक संपत भोसले यांचे प्रतिपादन




पारनेर : प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांनी शाळा महाविद्यालयात शिक्षण घेत असताना सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवण्याचे आवाहन पोलिस उपाधीक्षक संपत भोसले यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमधील बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात भोसले हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना संपत भोसले म्हणाले, आई-वडील-शिक्षकांच्या आदराबरोबरच समाजातील मान्यवर व्यक्तींशी विनम्र रहावे. कठोर मेहनतीशिवाय या जगात काहीच नाही. इयत्ता दहावीनंतर आपल्या शिक्षणाचा आपण हा महत्वपुर्ण असा दुसरा टप्पा पार करणार आहात. आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करून आपल्या आवडत्या क्षेत्रात महाविद्यालयीन शिक्षण घ्यावे व जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक समीर बारवकर यांनी सांगितले की कोणत्याही कामात सातत्य असल्याशिवाय यशप्राप्ती होत नाही.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर म्हणाले, या पुढील काळात आव्हाने खूप येत राहतील. त्या आव्हानांचा सामना करून जीवनात यशस्वी होण्याचा मुलमंत्र डॉ. आहेर यांनी दिला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांनीही विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.
याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील देवराती बिंदू, समिक्षा भंडारी, सार्थक भोर या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व्ही.एच. कोडार, जी. के.खोडदे, एस.जी.दुधाडे या शिक्षकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.अशोक शिंदे यांनी सुत्रसंचलन, संजय कोल्हे यांनी प्रास्ताविक तर एस.जी.जमदाडे यांनी आभार मानले.

# मॅरेथॉन स्पर्धेत किसानचे विद्यार्थी चमकले

## १५ विद्यार्थ्यांना बक्षिसे । क्रीडा क्षेत्रात लौकिक कायम

पारनेर : प्रतिनिधी

**नागेश्वर मित्र मंडळ व तालुका क्रीडा संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करणयत आलेल्या राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत पारनेर शहरातील किसान इंटरनॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी सुवर्णधाव घेत स्कुलचा क्रीडा क्षेत्रातील लौकिक कायम राखला. स्कुलच्या १५ विद्यार्थ्यांना या स्पर्धेत बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.**

शनिवारी पारनेर येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत तालुक्यास मुंबई, पुणे, नाशिक येथील स्पर्धक सहभागी झाले होते. चार गटांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. २५ वर्षांची परंपरा असलेल्या या स्पर्धेला उत्सफुर्त प्रतिसाद लाभला.

नागेश्वर मित्र मंडळाचे पदाधिकारी यांच्यासह पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर, किसान स्कुलचे प्राचार्य मनोज राठोर, तालुका क्रीडा अधिकारी बापूसाहेब होळकर, किसान स्कुलच्या सर्व शिक्षकांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.



### यशस्वी विद्यार्थी

या स्पर्धेत यश मिळविलेले किसानचे विद्यार्थी पुढीलप्रमाणे :
धनश्री झंजाड, फहीम शेख, जय विधाटे, शिवम दिघे, नेहा चेडे,खुशी चेडे, तन्वी परिहार, कार्तिक रेपाळे, करण बोरूडे, समर्थ लोंढे, वैष्णवी चेडे, पूर्वा बोरूडे, सेजल पुजारी, आराध्य पाटील, विशाखा झंजाड, मुग्धा पाटील, श्रेयस जवरे या विद्यार्थ्यांनी आपआपल्या गटात प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक पटकाविले. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

### नियमित सरावाचे फलीत

किसान शैक्षणिक संकुलामध्ये विद्यार्थ्यांकडून दररोज ६०० ते ८०० मिटर अंतर धावण्याचा सराव करून घेतला जातो. नियमित सरावामुळे किसानच्या विद्यार्थ्यांनी या राज्यस्तरीय स्पर्धे त दमदार कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा विभागाकडेही लक्ष देण्यात येत असून विद्यार्थी शारीरीक दृष्टया तंदुरूस्त राहिला पाहिजे याची काळजी घेण्यात येते. क्रीडा शिक्षक ऋषिकेश औटी यांच्या मार्गदर्शनाखाली स्कुलचे विद्याथ यापुढील काळातही विविध स्पर्धांमध्ये चमकलेले दिसतील.

चंद्रकांत चेडे, अध्यक्ष, किसान बहुउददेशिय संस्था

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com